# महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, अंबड

# निविदा संच

शासकीय तंत्रनिकेतन अंबड या संस्थेस मेस निविदा बाबत...

# निविदा संच

निविदा जा.क्र.शातंअं/मेस मुलां/मुलींचे/निविदा/२०२३-२०२४/नि.दिनांक १९.०७.२०२३


संस्थेचा पत्ताः- म्हाडा कॉलनी, पाचोड रोड अंबड

दुरध्वनी कार्यालय (०२४८३)-२७५०१० फॅक्स २७५०१०

ईमेल आयडीः-

principal.gpambad@dtemaharashtra.gov.in

# निविदा अर्ज

दिनांक

प्रति,

मा.प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन, अंबड

विषयः- संस्थेच्या मुलां/मुलींच्या वसतीगृहात मेस सेवा पुरविणे बाबत..

महोदय,

शासकीय तंत्रनिकेतन अंबड या संस्थेतील मुलां/मुलींचे वसतीगृहात मेस स्वतत्रंपणे (मुलाचे व मुलीचे जेवण स्वतत्रंपणे ज्यात्या मेस मध्ये तयार करणे )चालु करण्यासाठी मेस सेवा पुरविण्यास मी इच्छुक आहे. खालील अटी व नियम मला मान्य आहेत. व त्यांच्या अधिन राहुन मी मेस सेवा देईल याची मी हमी देत आहे.

०१ मुलांची संख्या साधरणपणे २०० व मुलीची संख्या साधरणपणे १५० असे एकूण ३५० विद्यार्थी मेस सभासद होऊ शकतात.(संख्या कमी जास्त होऊ शकते)

०२ रोजनदारी सेवा समाप्ती दिनांक -------- अंदाजे २० मे २०२४ पर्यंत

०३ जेवणाच्या वेळा -------- दुपारी १२:३० ते दुपारी १:३० पर्यंत

सायंकाळी ७:३० ते रात्री ८:३० पर्यंत

फिस्ट असेल तर ---------- दुपारी १२:३० ते दुपारी २:०० पर्यंत

०४ चहा व नाष्टा ---------- सकाळी ७:३० ते ८:३० पर्यंत

०५ शुध्द शाकाहारी मेनु ---------- विद्यार्थी समितीने ठरवुन दिल्याप्रमाणे

अ) जेवण ---- गव्हाची चपाती,सुकी भाजी/ओली भाजी, भात आमटी/वरण चटणी , लोणचे

ब) शुध्द शाकाहारी फिस्ट------ महिन्यातुन एक दिवस (दुपारी /सायंकाळी)

गव्हाची पुरी/चपाती,भाजी,गोड पदार्थ, मसाला भात/जिराभात, बटाटे वडे/भाजी

आमटी/वरण/कढी/ताक, पापड, कोशिंबीर, चटणी पापड लोणचे.

क) फिस्ट च्या दिवशी सायंकाळी उपहार-----मिसळ पाव/उपीट/खिचडी/कढी/वरणभात/पावभाजी इत्यादी.

वेळ सायंकाळी ७:३० ते ८:३० पर्यंत

मेस चालकाची सही व दिनांक

टिपः- समितीने ठरवल्याप्रमाणे जेवण्याच्या वेळेत बदल होऊ शकतो.

# ०१ मेस चालकाकडुन अपेक्षित सेवा

०१ आठवडयातील सर्व जेवणाचे मेनु विद्यार्थी समिती ठरवुन देईल, त्याप्रमाणे सर्व मासिक सभासदांना वेळेवर पोटभर जेवण देणे.

०२ विद्यार्थी समितीच्या मागणीनुसार दररोज नेमुन दिलेल्या वेळेवर चहा व नाष्टा आणि जेवण हे ताजे व गरम देणे

०३ धान्य बाजारातुन आणल्यावर निवडणे, खराब होऊ नये, उंदिरामुळे नासाडी होऊ नये म्हणुन सर्व काळजी घेण्याची जबाबदारी मेस चालकाची असेल.

०४ भाजीपाला दररोज निवडणे, स्वच्छ धुवुन वापरणे आणि शिल्लक राहीलेला भाजीपाला योग्य ठिकाणी साठवुन ठेवणे.

०५ सर्व भांडी घासणे,धुणे, पुसणे आणि व्यवस्थीत ठेवणे.

०६ मेस कार्ड धारक मासिक सभासदांना टेबलावर जेवणाचे ताट लावणे, आहार वाढणे,नाष्टा देणे व जेवणे/नाष्टा/चहा झाल्यानंतर ताट/प्लेट/कप उचलणे.

०७ धान्य बाहेरुन दळुन आणणे

०८ गॅस सिलेंडर साठी नंबर लावणे व सिलेंडरची ने -आण करणे. त्यांचा सर्व हिशोब वेळेवर संस्थेस देणे.

०९ मेस डाईनिंग हॉल, किचन रुम, दररोज भांडी घासण्याची मोरी न चुकता साफ करणे. मेस मधील बाथरुम, संडास साफ करणे.

१० मेस मधील दररोजचा कचरा ओला व सुका वेगळा गोळा करुन मेस बाहेर योग्य ठिकाणी टाकणे.

११ मेस मधील खरकटे/शिळे अन्न कच-यामध्ये न टाकता योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे.

१२ मेस सुरळीत चालविण्याकरीता संपुर्ण व्यवस्थापन हे मेस चालकाचे राहील ( मेस स्वच्छता ,निरोगी पाणी पुरवणे , किराणा, भाजीपाला,गॅस शेगडी यांचे आवश्यकतानुसार यादी बनविणे,मेस मध्ये येणारे व जाणारे यांच्यावर देखरेख व निगराणी ठेवणे, जेवणासाठी आलेल्या अतीथी यांच्याकडून शुल्क स्विकारुन पावत्या देणे.व इत्यादी )

१३ प्राचार्यांच्या परवागीने मेस जेवणाकरीता आलेल्या अतिर्थींना शुल्क आकारुन जेवण देणे.

# ०२ संस्थेकडुन मेसचालकाला निःशुल्क सुविधा-

संस्थेकडुन निविदा मंजुर झालेल्या मेस चालकास खालील वस्तु/साहित्य निःशुल्क मिळतील. वस्तु ताब्यात दिल्यावर पोच देणे व सेवा समाप्ती झाल्यावर वस्तु जमा करणे. अन्यथा अनामत रक्कम परत दिली जाणार नाही.

०१ जेवणाची आणि स्वयंपाकाची भांडी

०२ गॅस सिलेंडर व शेगडी

०३ टेबल व खुर्च्या

०४ फॅन व टयुब लाईट

०५ पाणी पुरवठा

०६ विज पुरवठा

०७ वसतीगृहातील मेस हॉल, किचन, स्टोअर बाथरुम-संडास

## ०३ दैनंदिन पुरवठा/निरंतर पुरवठा-

मेस मध्ये आहार बणविण्यासाठी किंवा इतर कामासाठी खालील गोष्टी पुरविल्याजातील.

०१ धान्य

०२ भाजीपाला

०३ आहारासाठी लागणारे सर्व मसाले,तेल, किराणा सामान इत्यादी

०४ धान्य दळुन आणण्यासाठी पैसे दिले जातील याचा हिशोब वेळेवर सादर करावा लागेल. यासाठी स्वतंत्र रजिस्टर मेस चालकाला ठेवावी लागेल.

## ०४ आर्थिक व्यवहार व वस्तु खरेदी-

मासिक सभासदांकडुन वर्गणी गोळा करणे,हिशोब ठेवणे, दैनंदिन धान्य/भाजीपाला/वस्तु इत्यादी खरेदी करुन उपलब्ध करुन देणे. दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे इत्यादी गोष्टी करण्याकरिता संस्थेने नेमुन दिलेले विद्यार्थी समिती करतील. गॅस सिलेंडर आणण्यासाठी व धान्य दळुन आणण्यासाठी मेस चालकास पैसे त्यावेळेस दिले जातील. व मेस चालकाने त्याचा हिशोब संस्थेस वेळोवेळी सादर करणे बंधनकारक असेल.

महिना पुर्ण झाल्यानंतर मेस चालकास सेवा पुरविल्या बददलचे बिल हिशोबाप्रमाणे देय रक्कम खात्यात जमा करण्यात येईल. अथवा मेस चालकाच्या नावे चेक देण्यात येईल.

पहील्या मेस मजूरी हे त्या महिण्याच्या मेस सभासद संख्यानूसार अनुज्ञेय राहील.
निवीदा मध्ये ठरविण्यात आलेल्या रोंजदारी कामगारांची संख्या कमी असेल तर मोबदला कमी देण्यात येईल.

मेस सेवा पुरविण्यासाठी मेस चालकास कोणत्याही प्रकारची अग्रिम रक्कम मिळणार नाही.

## ०५ मेस चालकाची जबाबदारी-

०१ मुलांच्या संख्येनुसार अन्न तयार करावे, जेणेकरुन अन्न शिल्लक राहणार नाही व अन्नाची नासाडी होणार नाही. याची दक्षता घ्यावी, तसेच शिळे अन्नाची रोजच्या रोज योग्य विल्हेवाट लावणे.

०२ अन्नातुन विषबाधा होऊ नये म्हणुन मेस चालक दक्ष राहतील. रोजच्या आहाराची तपासणी स्वतः मेसचालकाने करुनच नंतर मुलांना जेवायला आहार पुरविणे या संदर्भात मेस चालकाने हमी पत्र देणे बंधनकारक आहे.

०३ अन्नातुन विषबाधा झाल्यास मेस चालकाला जबाबदार धरण्यात येऊन त्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल्.

०४ मेस मधील धान्य,भजीपाला,दुग्धजन्य पदार्थ सुरक्षित ठिकाणी ठेवणे.

०५ मेस साठी काम करणारे सर्व स्त्री व पुरुष कामगार हे बालकामगार असु नयेत.

०६ सर्व कामगार निरोगी, निर्व्यसनी व सदृढ असावे. त्यांची नियमीत मासिक आरोग्य तपासणी करुन तसे वैद्यकीय प्रमाणपत्र संस्थेस सादर करावे लागेल.

०७ कामगारांविरुध्द कोणत्याही प्रकाराची गुन्हयांची नोंद पोलीस स्टेशनमध्ये नसावी. तसेच त्यांच्याबददल चारित्रपडताळणी/वर्तवणुक प्रमाणपत्र संस्थेस सादर करावे लागेल. तसेच संस्थेत वावरताना त्यांना संस्थेच्या

नियमांचे पालन करणे आवश्यक राहील.

०८. आरोग्याच्या दृष्टीकोनातून सर्वांना ताजे व गरम अन्न देण्याची जबाबदारी मेस चालकाची राहील.

०९. मुलांचे व मुलींचे जेवण स्वतत्रपणे ज्या त्या मेस मध्ये तयार करण्यात यावे.

१०. मेस करीता पुरविण्यात येणा-या सामानाची चढउतार करण्याची व व्यवस्थीपणे जागेवर ठेवण्याची जबाबदारी मेस चालकाची राहील.

११.कामगारांना अपघात होऊ नये याची काळजी घेणे, गॅस सिलेंडर,विज इत्यादी उपकरणे काळजीपुर्वक हाताळणे. कामगारांचा अपघाती विमा उतरविणे अत्यावश्यक आहे. मेस चे कामे करतांना कोणतेही अनुचित अपघात घडल्यास मेस चालक जबाबदार राहील.

१२ सदरील निविदा प्राप्त करण्यासाठी कोणत्याही राजकीय संघटना व पक्ष यांचा दबाव आणल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

१३ संस्थेच्या आवारात कामगारांना धुम्रपान,मद्यपान करण्यास सक्त मनाई आहे.

१४ कामगारांनी कोणत्याही विद्यार्थ्यांशी भांडणतंटे करु नये तसेच धार्मिक तेढ निर्माण होईल असे कार्य/वर्तण करु नये.

१५.कामगारांची हजेरी मांडणे, वेतन देणे, आठवडा सुटटी देणे व त्याठिकाणी पर्यायी व्यवस्था करणे इत्यादीबाबत सर्व जबाबदारी मेस चालकाची राहील.

१६ मेस सेवा सुरळीतपणे पार पाडण्याकरिता --

| अ.क्र. | मुलांची मेस | मुलींची मेस |
|---|---|---|
| १ | मेस व्यवस्थापक — ०१ | मेस व्यवस्थापक — ०१ ( महिला ) |
| २ | मुख्य स्वयंपाकी —– ०१ | मुख्य स्वयंपाकी —– ०१ (पुरुष / महिला ) |
| ३ | सहाय्यक स्वयंपाकी -०१ | सहाय्यक स्वयंपाकी -०१ (महिला) |
| ४ | महिला मदतनीस- ०४ | महिला मदतनीस- ०३ |
| | **एकुण :- ०७ कर्मचारी वर्ग** | **एकुण :- ०६ कर्मचारी वर्ग** |

१७ लाईट/विज/पाणी यांचा अनावश्यक वापर टाळावा.

## ०६ कामागारांसाठी नि:शुल्क आहार-

फक्त नियमीत मेसमध्ये काम करणा-या कामगारांना मेसमध्ये मोफत चहा/नाष्टा/जेवण मिळेल, पंरतु त्यांना जेवण घरी घेऊन जाण्यास मनाई आहे. तसेच मेस कामगारांच्या नातेवाईकांना किंवा अभ्यागतांना जेवणास मनाई आहे.

## ०७ सुरक्षित अनामत रक्कम-

०१ मेसमधील सर्व साहित्यांची (भांडी,गॅस सिलेंडर,टेबल खुर्च्या, फॅन,टयुब इत्यादी), इमारतीतील सर्व वस्तु सांभाळण्याची जबाबदारी मेस चालकाची असेल. मेस चालकाकडुन काही वस्तु गहाळ, मोडतोड, नुकसान झाल्यास वस्तुंच्या बदलीत नविन वस्तु जमा करावी लागेल. अन्यथा अनामत रक्कम परत मिळणार नाही. बिनव्याजी

सुरक्षित अनामत रक्कम रुपये ३००००/-(अक्षरी तीस हजार रुपये फक्त) संस्थेकडुन निविदा मंजुर झाल्यांनतर कामाचा आदेश मिळाल्यानंतर ३ दिवसांच्या आत संस्थेकडे रक्कम जमा करावी, अन्यथा निविदा रदद करण्यात येईल.

०२ मेस सेवा पुरविण्याचे काम मेस चालकाने कोणत्याही कारणास्तव अंतिम दिनांकापुर्वी बंद केल्यास सुरक्षित अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. व कोणत्याही सबबीवर परत कधीच मिळणार नाही याची नोंद मेस चालकानी घ्यावी.

## ०८ सेवा बंद करणेबाबत-

मेस चालकाकडुन गुणवत्तापुर्ण सेवा पुरविण्यात तीन वेळा लेखी सुचना देऊनही सुधारणा होत नाही असे संस्थेला निदर्शनास आल्यास संस्था अंतिम दिनांकापुर्वी

केव्हाही मेस सेवा कायमस्वरुपी रदद करण्याचा अधिकार संस्थेचे प्राचार्य यांच्याकडे राखुन ठेवत आहे. अशा सुरक्षित अनामत रक्कम जप्त होऊन शासनास जमा होईल.

## ०९ मेस सेवा पुरविण्याचा मासिक शुल्क-

| **मुलांचे वसतीगृह मेस (अंदाजे २०० मेस सभासद)** | **मुलींचे वसतीगृह मेस (अंदाजे १५० मेस सभासद)** |
|---|---|
| मेस व्यवस्थापक – ०१ व्यक्ती रुपये ....... प्रति महिना | मेस व्यवस्थापक – ०१ व्यक्ती रुपये ....... प्रति महिना |
| मुख्य स्वयंपाकी - ०१ व्यक्ती रुपये ....... प्रति महिना | मुख्य स्वयंपाकी — ०१ व्यक्ती रुपये ....... प्रति महिना |
| सहाय्यक स्वयंपाकी -०१ व्यक्ती रुपये ....... प्रति महिना | सहाय्यक स्वयंपाकी -०१ व्यक्ती रुपये ....... प्रति महिना |
| महिला मदतनीस- ०४ व्यक्ती रुपये ....... प्रति महिना | महिला मदतनीस- ०३ व्यक्ती रुपये ....... प्रति महिना |
| **मुलींचे मेसचे एकुण सेवा शुल्क-<br>रुपये ---------------------प्रति महिना** | **मुलांचे मेसचे एकुण सेवा शुल्क-<br>रुपये ---------------------प्रति महिना** |
| **दोन्ही मेसचे एकूण सेवा शुल्क रुपये ---------------------प्रति महिना** | |

दिनांक                                                                 मेस चालकाची सही व संपुर्ण नाव

## १० बयाणा रक्कम व निविदा शुल्क-

०१ निविदा शुल्क- परिपुर्ण भरलेला निविदा व सर्व आवश्यक प्रमाणपत्रांचा संच बंद लिफाफयात संस्थेत जमा करतेवेळी निविदा शुल्क पोटी रु १००/-(अक्षरी शंभर रुपये फक्त) रोख जमा करावे.

०२ बयाणा रक्कम सदरील निविदा करिता बयाणा रक्कम रु ५०००/-(अक्षरी पाच हजार रुपये फकत) डिडिच्या

स्वरुपात कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, अंबड यांच्या नावे स्टेट बँक ऑफ इंडिया अंबड येथील शाखेसाठी देय असलेले बंद लिफाफयात जोडावे व त्यांचे नंबर निविदेत नमुद करावे.

डि डि क्रमांक-----------------

बँकेचे नाव-------------------

दिनांक---------------------

## ११ आवश्यक प्रमाणपत्रांची छायांकित सत्यप्रतीः-

०१ मेस/केटरिंग व्यवसाय करण्याचा निविदा अर्ज सादर करणा-यांच्या नावे अन्नसुरक्षा व मानदे अधिनियम २००६ प्रमाणे अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांच्याकडुन दिले जाणार शासकीय नोंदणीकृत प्रमाणपत्र

०२ अनुभव प्रमाणपत्र किमान ०३ वर्ष अनुभव असणा-यास प्राधान्य दिले जाईल.

०३ कायमचा व तात्पुरता राहण्याचा पत्ताचा पुरावा

०४ ओळखपत्र-पॅन कार्ड व आधार कार्ड

०५ राष्ट्रीयकृत बँक खाते पासबुक

## १२ निविदा मंजुर अथवा नाकारण्याचा पुर्ण अधिकार संस्था राखुन ठेवत आहेः-

वरिल सर्व बाबी/अटी/नियम मी स्वतः वाचले असुन समजुन घेतले आहे व मला मान्य असुन या निवविदा अर्जातील प्रत्येक पानाच्या शेवटी मी स्वतः सही केली आहे तरी मी मेस सेवा पुरविण्याचे काम करण्यास इच्छुक आहे. कृपया मला संधी मिळावी. ही नम्र विनंती.

स्थळः- शासकीय तंत्रनिकेतन अंबड

दिनांकः- मेसचालकाची सही व संपुर्ण नाव

पत्ताः- ------------------------------------------------------ ------------------------------------------------------

------------------------------------------------------ ------------------------------------------------------

**(निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ :- दिनांक २७ जुलै २०२३ वेळः- दुपारी २:००)**

# <u>हमीपत्र</u>

मी ------------------------------------------------------------------- असे शपथपुर्वक निवेदन करतो की, शासकीय तंत्रनिकेतन, अंबड यांच्या विद्यार्थी सहकारी भोजनालय चालविण्यासाठी आवश्यक असणा-या सर्व अटी व शर्ती वाचल्या व त्या मला मान्य आहेत. भोजनालयामध्ये विद्यार्थ्यांना अन्नामधुन कोणत्याही प्रकारची विषबाधा होणार नाही याची दक्षता भोजनालय प्रमुख म्हणुन माझी स्वतःची असेल. याबाबत काही गुन्हा नोंद झाल्यास त्यास मी स्वतः जबाबदार राहील.

वरील सर्व माहिती खरी व बरोबर आहे, हे शपथेवर सांगतो.

दिनांक

अर्जदार --------------------------------------------

सही --------------------------------------------